RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकीटे लावून पोस्टाने पाठविण्याचा परवाना – Regd. NSK / 231 / 2015-2017
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.



किंमत १ रुपया

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

वर्ष ४१ वे | अंक ७ वा | १० नोव्हेंबर २०२०

## चित्तपावन ब्राह्मण संघाच्या वतीने सर्व सभासद बंधू-भगिनी, जाहिरातदार, हितचिंतक यांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



नवरात्री : अष्टमी श्री महालक्ष्मी पूजन



**अष्टमीचे लक्ष्मी पूजन व्रत**
लक्ष्मी पूजन करतांना
सौ. रसिका देसाई, सौ, हर्षदा गोखले



**श्री महालक्ष्मी पूजन** आरती करतांना
सौ. जान्हवी नातू सोबत
सौ. फाळके सौ. परांजपे,
सौ. वाड, सौ. जोगळेकर,
सौ. रानडे, सौ. गोखले
व इतर भगिनीवर्ग



**श्री सुक्त पठण**
पठण करताना सौ. माधुरी जोशी,
सौ. अमृता वाड, सौ. जान्हवी नातू,
सौ. स्मिता रानडे, आणि इतर भगिनीवर्ग

## चित्तपावन ब्राह्मण संघ
# ‘स्नेहबंध मैत्रिणींचा’ ...

मैत्रिणींनो,

शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर, रोजी आपल्या काका गद्रे कार्यालयात श्री महालक्ष्मी चा उत्सव व्यवस्थितपणे यथासांग पार पडला. मात्र ‘भरपूर लोकांच्या उपस्थितीत’ ‘उत्साह’ ‘उधाण’ हे शब्द नाही वापरता येणार कारण सध्याच्या परिस्थितीमुळे तुम्ही सर्वजण हजर राहू शकला नाहीत. असो,

देवीच्या सेवेत आपण काहीही कमी पडू दिले नाही, सर्व सदस्य, मैत्रिणी, अनेक भक्तगण यांची आठवण झाली. मात्र नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन संविद जोगळेकर याने सकाळच्या पूजेची ऑनलाईन व्यवस्था करून दिली. १८ सवाष्णींनी घरी पूजा केली व २ जणींनी कार्यालयात पूजा केली. जेणे करुन त्या पूजेचे प्रात्यक्षिक इतर मुलींना पाहता आले. मंगला जोगळेकर यांनी पूजेचे पौरोहित्य केले. तसेच पूजा सांगताना मुलींना योग्य सूचना देखील दिल्या. पूजेनंतर आरती व कहाणी वाचन झाले.

प्रथम जरा सगळं वेगळं वेगळं वाटत होते पण सर्वांच्या आरोग्याचा विचार करता ते योग्यच होते. संध्याकाळी नेहमीप्रमाणे ७ वा. देवीची विधिवत पूजा झाली. या वेळी माधुरी जोशी यांनी पूजा सांगितली व जान्हवी नातू यांनी पूजा केली.

पिवळी साडी नेसलेली, सर्व अलंकारांनी नटलेली श्री महालक्ष्मीची मूर्ती अत्यंत तेजस्वी व छान दिसत होती. मुखवटा नेहमीप्रमाणे रेखीव झाला होता. संध्याकाळी सुद्धा ऑनलाईन दर्शनाची सोय होती. त्यामुळे गावात, महाराष्ट्रात, देशात व परदेशात देखील अनेकांनी देवीच्या दर्शनाचा लाभ घेतला. ‘श्री सुक्त पठण’ घागरी फुंकण्याचा कार्यक्रम आनंदाने पार पडला. मात्र नेहमीची गडबड, लगबग, गर्दी तीच, गाणी ह्या सगळ्याची अर्थातच उणीव होती.

श्री. महालक्ष्मीला हे संकट लवकर दूर होऊ दे अशी प्रार्थना केली आहेच. पुढील भेट कधी होणार, मासिक सभा कधी घ्यायची ते अंकातून कळवले जाईल.

अष्टमीच्या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मैथिली गोखले, माधवी जोगळेकर, मंगला जोगळेकर, अमृता वाड, वासंती फडके, जान्हवी नातू, ऐश्वर्या साने, स्मिता रानडे, सुनिता परांजपे, जयश्री दामले, संध्या केळकर या मैत्रिणींनी प्रयत्न केले. तसेच काका गद्रे कार्यालयातील सर्व सहकारी व कार्यकारी मंडळाची मदत होतीच ! संविद जोगळेकर व त्याच्या टीम चे आभार.

संविद जोगळेकर आणि त्यांचे सहकारी यांनी देवीची सेवा म्हणून ऑन लाईन सुविधा विनामूल्य उपलब्ध करुन दिली या बद्दल पुनश्च मनःपूर्वक आभार. . . !

पुढील भेटी पर्यंत नमस्ते !

## चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक रोड शाखा
## अष्टमी पूजन

सकाळी एकूण ५ मुली पूजेसाठी उपस्थित होत्या . सकाळी २० जणांचे उपवासाचे पदार्थ सौ. किर्ती देवधर यांनी दिले. श्री. व सौ. प्रकाश मेहेंदळे ह्यांच्या हस्ते संध्याकाळी ७ वाजता आरती झाली. बापट चॅरिटेबल ट्रस्ट चे श्री. प्रशांत सोमण, भास्कर चितळे आणि श्री. व सौ. सदाशिव काळे यांनी ट्रस्टचा हॉल उपलब्ध करून दिला .

अष्टमी पूजनाचा कार्यक्रम यशस्विरित्या संपन्न झाला. २ तासाचे फेसबुक लाईव्ह केले . फेसबुक वर आपण हा कार्यक्रम आपल्या सवडीनुसार बघू शकता.

सौ माधवी भाभे ह्यांनी पूजेची सर्व जबाबदारी पार पाडली. सौ निता गोवंडे , सौ मीना गोवंडे, सौ वीणा दांडेकर , अपूर्वा दांडेकर , सौ. सेजल बर्वे, श्री भास्कर मेहेंदळे, श्री सुधीर फडके, श्री व सौ समीर गोवंडे, श्री व सौ प्रकाश मेहेंदळे, श्री व सौ उदय गाडगीळ, प्रेरणा मेहेंदळे, सुशील , आशा आणि यशा सहस्रबुद्धे या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले . जास्तीत जास्त सभासदांनी घरातूनच देवीचे दर्शन घेऊन सहकार्य केले.

चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक व नाशिक रोड शाखा यांच्या वतीने सर्वांचे खूप खूप आभार.

# करोना लस पूर्व चाचणी - अनुभव कथन

करोना - COVID 19 मुळे मानवाच्या हव्यासापोटी आज जगावर मानवी विनाशाची वेळ येऊन ठेपली आहे. विनाशकारी हव्यासापोटी प्रयोगशाळेत विषारी कणाची निर्मिती करून त्याचा शिरकाव मानवी शरीरात झाला आणि मोठ्या मानवी विनाश सत्राला मानवामुळेच आरंभ झाला. जो पुढे अनियंत्रित झाला. हे विषरूप अणूसारखे कण मानवाला अल्प काळात नष्ट करण्यासाठी पुरेसे आहेत.

नावही अगदी साजेसेच बघा ह्याचे. ये करो ना, वो करो ना, आवो ना, जावो ना, म्हणत म्हणत सगळ्यांना त्याने बंदिवान केले. चोर दरोडेखोरांना तुरुंगात घालून तिथून कोठेही जाण्यास बंदी असायची म्हणून त्याला तुरुंगवास म्हणायचे. पण आता ह्या करोनाने साऱ्या जगाचेच तुरुंगात रूपांतर केले आहे जणू. हळू हळू ह्याने आपले रंग ढंग दाखवायला सुरुवात केली तसतसे ह्याला पकडण्यासाठी धावपळ सुरू झाली. त्यात मग आंतरराष्ट्रीय राजकारण, देशांतर्गत राजकारण, वैचारिक भेदाभेद, जागतिक आर्थिक उलाढाली आणि सर्वसामान्य माणूस ह्या सगळ्यांनाच त्याने आपल्या फेऱ्यात घेतले.

त्यात मग मोल मजुरी करणारे, हातावर पोट असणारे, नाकासमोर चालून आपली उपजिविका करणारे, भट भिक्षुक छोटे व्यवसाई, विद्यार्थी वर्ग ह्यात होरपळून निघाले. नेमके काय केले? म्हणजे हे नष्टचर्य संपेल ह्याचा विचार करीत प्रत्येक जण आजचा दिवस ढकलतोय. पण तरीसुद्धा जर नीट विचार केला तर असे दिसते की जेवढी ही वास्तविकता भयानक आहे तेवढी झळ आपल्याला बसते आहे का? तर प्रामाणिकपणे त्याचे उत्तर नाही असे द्यावयास हवे. का? तर मला असे वाटते की, राजकीय ताकद जर प्रामाणिक असेल, धीरोदात्त असेल, सहिष्णू असेल तर नक्कीच ह्या अशा भयानक घटनांमुळे होणारे भयानक परिणाम, त्याची विदारकता आपल्यापर्यन्त खूप कमी प्रमाणात पोहचते आहे. ह्या सगळ्या विपरीत परीस्थितीचे सर्वसमावेशक अभियानात रूपांतर करून घेण्याची तयारी ह्या सरकारमध्ये असल्याने,आपण सर्वच ह्या आगळ्या वेगळ्या अभियानाचे एक घटक झालो. भारत देश परत विश्वगुरु होण्यासाठी तयार आहे हे लक्षात आले. आपण प्रत्येक जण ह्या समाजाचा एक घटक आहोत आणि आपले सामाजिक कर्तव्य म्हणून मी काही तरी केले पाहिजे हा विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचला. त्यातूनच आपल्यातलेच बंधू भगिनी देवदूतासारखे पुढे सरसावले. कोणी धान्य वाटप केले, कोणी अन्न वाटप केले, कोणी धान्य संकलन केले, काढा वाटप केले, औषध वाटप केले, मास्क वाटप केले, कोणी विस्कटलेल्या कुटुंबातील लहान मुले, वृद्ध, आजारी व्यक्ति ह्यांचा सांभाळ केला. कोणी चाऱ्याचा प्रश्न सोडवला, कोणी ह्या सर्वांसाठी लागणाऱ्या निधि संकलनाचे काम केले, कोणी रक्त दान, प्लाज्मा दान ह्या साठी आवाहन केले, तर कोणी समाज प्रबोधनाचे काम केले.

किती तऱ्हेची म्हणून कामे सांगावीत? हे सगळे वैयक्तिक पातळीवर, समाजसेवी संस्थामार्फत, गणपती मंडळांच्या मार्फत, तर काही ठिकाणी नव नवीन गट स्थापन करून ह्यातील आपला वाटा उचलण्यासाठी तरुण तरुणी आपणहून पुढे येत गेले. एकूणच हे चित्र पुढील सुदृढ भारताच्या प्रगतीसाठी तयार झालेले सामाजिक भान ठेवून कार्य करण्यासाठी सुरू झालेले सामाजिक उत्थापन आहे.

ह्या सर्वात मोठा वाटा आपले पोलिस दल, सफाई कर्मचारी, रुग्णालयातील कर्मचारी, डॉक्टर, परिचारिका, साहित्य व औषध निर्माण संस्था, कारखाने, छोटे दुकानदार, बँक कर्मचारी व इतर असे बरेच व्यावसायिक ह्यांचा आहे. ह्या सर्वांचे अथक प्रयत्न, दिवस रात्र सतत काम करणे ह्या साठी आपण ह्या सर्वांचे सदैव ऋणी असणार आहोत. प्रत्येक घटनेला जशी सुरूवात असते तसाच त्याचा अंतही ठरलेला असतो. आता ह्या करोना नामक भस्मासुराला मारण्यासाठी समस्त शास्त्र जगत आपल्या ज्ञानाची/प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. कोणतेही औषध, लस सर्वांपर्यंत पोहचण्याआधी त्यावर निरंतर, दीर्घ काळ चाचण्या घ्यायच्या असतात व ते कसोटीला उतरले की मगच त्या आजारावरील उपाय म्हणून ते वापरण्यायोग्य तयार होते. करोना लसीच्या पूर्व चाचणीपर्यन्त आता संशोधन सस्थांचे प्रयत्न निष्कर्षा पर्यन्त आले आहेत.

मी कल्याण आश्रम, गोवा इथे पूर्ण वेळ कार्यकर्ती म्हणून काम करते आहे. या वेळेस लॉक डाउन असल्याने संपर्काचे काम बंद आहे. तेव्हा आपण काय करू शकतो ह्याचा विचार करीत होते आणि एक संधी चालून आली. आपल्या देशातील बऱ्याच संस्था संशोधन करीत आहेत. त्यातील एक - भारत बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड, हैदराबाद, ह्या संस्थेच्या करोना लसीच्या पूर्वचाचणीसाठी माझी निवड झाल्यामुळे मी स्वतःला खूप भाग्यशाली समजते आहे. ह्या मोठ्या संघर्षाचा मी छोटासा हिस्सा होऊ शकले ह्या बद्दलचे माझे हे अनुभव कथन.

गोव्यातील रेडकर हॉस्पिटलमध्ये करोना लसीच्या पूर्व चाचणीसाठी स्वयंसेवक हवे आहेत असा निरोप एका समुहावर वाचण्यात आला आणि तक्षणी मी तयार आहे असे मी मोठ्यांदा म्हंटले आणि परत तो निरोप वाचला. त्यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व निकषात मी बसत होते. तेव्हा पुढची तयारी. नवरा, मुलगा ही ह्याच

कामात असल्याने त्यांनी तुझी मानसिक तयारी असेल तर जरूर भाग घे असे सांगून प्रोत्साहनच दिले. आता अजून बळ आले होते. पण आता पुढील टप्पा जास्त महत्वपूर्ण होता, नुसती मानसिक तयारी काय कामाची? शारीरिकदृष्टया सुद्धा मी कसोटीला उतरायला हवी होते. त्यांनी दिलेल्या क्रमांकावर फोन करून मी चाचणीसाठी तयार असल्याचे कळवले. त्यांनी उद्या ११ वाजेपर्यंत हॉस्पिटलमध्ये या असे संगितले. हो तर म्हंटले, पण हॉस्पिटल मी रहाते तेथून ४०, ४५ km लांब आहे आणि तेथे पोहोचायला ३ बसेस बदलून जाणे आणि कोविडमुळे बसेस मिळून तिथे वेळेत पोहोचणे अवघड होते. पण म्हणतात ना, प्रामाणिक इच्छा असली की पुढचा मार्ग दाखवायला देव आपल्याला मदत करतो. तसेच झाले. संघाच्या सेवा प्रमुखांनी मला एका कार्यकर्तीचा नंबर दिला. ती पण चाचणीला जायला तयार होती. मी तिच्याशी बोलले आणि नवीन मैत्रीण ताबडतोब तयार झाली. अर्ध्या रस्त्यावर तिचे घर आहे. तिथपर्यन्त एक बस आणि पुढे तिची मोठी गाडी अशी व्यवस्था झाली. आम्ही दिलेल्या वेळेवर पोहोचलो. मला injection ची प्रचंड भीती वाटते. पण उत्साहाच्या भरात हीही बाब गौण वाटायला लागली. रिवाजाप्रमाणे Temparature गन, Oximeter लावून तपासणी झाली. पुढे फॉर्म भरून घेतला. पुढील साधारण वर्षभराची प्रक्रिया कशी असणार आहे, ह्यातील धोके काय असू शकतात हे समजावून सांगितले.आता पहिली पायरी म्हणजे रक्त तपासणी. (प्रत्येक वेळी रक्त, तपासणी होईल हे आमच्या फॉर्ममध्येच लिहिलेले आहे.) त्यात बऱ्याच चाचण्या आहेत. महत्वाची करोनासाठी swab चाचणी करण्यात आली. आता ns reports समाधानकारक असतील तर तुम्हाला ३ दिवसांनी परत बोलावू असे सांगितले. त्या प्रमाणे २ दिवसानी तुम्ही सक्षम आहात आणि उद्या सकाळी ११ वाजे पर्यन्त या असे सांगण्यात आले.

आता महत्वाचा टप्पा सुरू होणार होता vaccination. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी मला पहिला डोस दिला गेला. सर्व परत नीट समजावून सांगितले. महत्वाचे म्हणजे आता तुम्ही करोना मुक्त झाला असे समजून सगळीकडे फिरू नका असेही सांगितले. काहीही त्रास झाला तरी ताबडतोब फोन करा असे सांगितले, परत त्यांच्याकडून पण चौकशीसाठी फोन आला होता. पण मला देव कृपेने काहीही त्रास झाला नाही.

२८ दिवसानी ठरल्याप्रमाणे त्यांनी परत बोलवले. दुसरा डोस दिला गेला आणि vaccination पूर्ण झाले. vaccination नंतर शरीरांतर्गत बदलाचे निरीक्षण ह्यासाठी आता त्यांच्या चार्टप्रमाणे साधारण वर्षभर ते बोलवतील. तेव्हा रक्त, कोविड इत्यादि चाचण्या होतील. ह्या वेळी त्यांनी एक नोंदणी पुस्तक दिले आहे. कुठलाही बदल जाणवला तर फोन कराच पण त्याची नोंद पण करून ठेवा असे सांगितले.

अशा प्रकारे कोविड पूर्व चाचणी अभियान संपूर्ण देशभरात चालू आहे. स्वखुशीने, विना मोबदला ह्या अभियानात ज्यांची तयारी असेल अशांनी यावे ह्यासाठी संघामार्फत व्हाट्स ॲप समुहातून संदेश आपण देतो आहोत. ह्याला नेहमीप्रमाणे संमिश्र प्रतिसाद मिळाला आहे. लोकांच्या मनात भय असणे हे आपण समजू शकतो. कारण जी लस सिद्ध झालेली नाही त्याचा आपल्यावर प्रयोग होणार ज्यात वावगे काही घडणारच नाही ह्याची खात्री नसणे ही स्वाभाविक प्रतिक्रिया आहे. पण वाईट तेव्हा वाटले की, काही लोकांना असे वाटते की, असे धोकादायक काम मी करतेय म्हणजे काहीतरी पैसा त्यातून मला मिळत असावा. त्यांच्या मते त्या शिवाय का कोणी आपला जीव धोक्यात घालणार आहे ? हे मी येवढ्यासाठी येथे नमूद करते आहे कारण सर्व कार्यकर्ते स्वखुशीने तन मन धन पूर्वक कोणत्याही मोबदल्याशिवाय ह्या अभियानाचा हिस्सा झालेत. संशोधक खूप मेहनतीने ह्यावर संशोधन करीत आहेत. पण त्यांचा प्रयोग यशस्वी होण्यासाठी फक्त आपल्या सारख्यांची थोडी मदत लागणार आहे. आणि शेवटी ह्या सफलतापूर्वक तयार झालेल्या लसीचा फायदा सर्व जगालाच होणार आहे.

आता हा जसा थोडासा वाईट अनुभव आला तसा चांगल्या प्रतिक्रियाही खूप आल्या. माझे नातेवाईक, मित्र मैत्रिणी ह्यांनी खूप कौतुक केले व खूप शाबासकी दिली, धीर दिला. वेळोवेळी फोनवरुन संपर्कात राहून बळ दिले व त्यामुळे मात्र आपण एका खूप छान, स्तुत्य कामाचा हिस्सा झालोय ह्याचे समाधान वाटले.

आणखी एक अनुभव - डरावना होता बरं का. एकीने मला थेटच विचारले... कशाला गं या भानगडीत पडलीस? तू नीट माहिती का नाही घेतलीस आधी? अशाच एका पूर्व चाचणीत एक जण गेला म्हणे....

असो, तर अशा ह्या कोविड ने आपणा सर्वांचेच धाबे दणाणले आहे. त्याचे समूळ उच्चाटन व्हावे ह्यासाठी लवकरात लवकर ही लस सफल होऊ दे अशी भगवंताकडे प्रार्थना करूयात.

जय हिंद, जय भारत !

मंजुषा पराग केळकर, मो.- ८०८७१७१४५३

चित्तपावन मित्र ऑगस्ट २०२० या अंकात **इच्छा मरणाचा कायदेशीर हक्क एक परिपेक्ष** हा श्री. सुरेश पिंपळखरे यांचा लेख प्रसिद्ध झाला. याच विषयाच्या अनुषंगाने ॲड. अविनाश भिडे लिखित '**सुखांत जीवनाचा**' पुस्तकातील संपादित लेख क्रमशः पुढील अंकापासून प्रसिद्ध करणार आहोत.



## अभिनंदन !!

आपल्या संस्थेचे सभासद व उद्योजक मंचातील धडाडीचे कार्यकर्ते **श्री. महेश दाबक** यांची देशाच्या निती आयोगाच्या शैक्षणिक समितीवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. एकूण सहा अशासकीय सदस्य आहेत. साडेतीन दशकानंतर नवीन नियुक्त्या झाल्या आहेत. श्री. दाबक यांच्या रुपाने नाशिकला शैक्षणिक क्षेत्रातील नेतृत्व मिळणे ही अभिमानास्पद बाब आहे. समितीचे कार्य नवीन धोरणांची अंमलबजावणी करण्याचे आहे.

संस्थेच्या सर्व सभासदातर्फे श्री. महेश दाबक यांचे हार्दिक अभिनंदन !

भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !


## नटस् ॲण्ड डेटस्

(उत्तम दर्जाचा सुकामेवा)

**आमच्या कडे उत्तम दर्जाचा सुकामेवा राास्त भावात मिळेल.**

तसेच दिवाळीसाठी
खास ड्रायफ्रूट गिफ्ट बॉक्स उपलब्ध आहेत.



**संपर्क**

वासंती फाळके - **७७७७०९२८३२**

आरती भिडे - **८२३७०५००९२**

**web** - www.nutsanddates.com

**email :** nutsanddates209@gmail.com

**आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?**
**होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...**



## एक उपयुक्त दागिना...!

**अदृश्य श्रवणयंत्र**

**अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध**

**अनुभवी तज्ञांचे मार्गदर्शन**

मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

**संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य**

**संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक**

फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.

**Ph.: 2318333, Mob : 9422269394**

**शाखा :** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक

* अटी लागू

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम,
प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

## मिहिर कन्स्ट्रक्शन

**सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर**

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.

फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल : ०९४२२२४६८७८**

**ईमेल :** cvranade@gmail.com



**अष्टमीस श्री महालक्ष्मी पूजन व आरती**
उपस्थित श्रीमती मैथिली गोखले, सौ. ऐश्वर्या साने, सौ. संध्या केळकर, सौ. स्मिता रानडे आदी.

सर्वश्री. विजय साने, प्रभाकर केळकर, चंद्रशेखर रानडे, हेरंब घारपुरे, अनिरुद्ध अभ्यंकर





**महालक्ष्मी पूजन**
अष्टमीस महिला वर्ग घागरी फुंकताना

# भावपूर्ण श्रध्दांजली



नाशिकमधील विजय साने यांच्या मातोश्री **पुष्पा राजाराम साने** यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी दुखःद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नाशिक मर्चंट बँकेचे व आपल्या संस्थेचे अध्यक्ष विजय साने यांच्या त्या आई होत्या तर नगरसेवक ॲड. अजिंक्य साने यांच्या आजी होत्या. त्यांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.



जून्या पिढीतील प्लम्बिंग क्षेत्रातील नामवंत **श्रीधर भार्गव गांगल** यांचे नुकतेच वयाच्या ८२ व्या वर्षी दुखःद निधन झाले प्लम्बिंग सोबतच १९५७ पासून बोहर पट्टी येथे त्यांनी टिनमेकर व झाडू बांधणीचा व्यवसाय सुरु केला होता. ७० च्या दशकात नाशिक मध्ये उद्योग नगरी उभी रहात असतांना अनेक कारखान्यांमध्ये त्यांनी प्लम्बिंगचे काम केले होते. त्यांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.



**मोहन महाबळ** यांचे अल्पशा आजाराने नुकतेच दुखःद निधन झाले त्यांना हॅपीटायसिस बी कावीळ मधला रेअर आजार झाला होता. तो हजारात / लाखात १/२ टक्के लोकांना होतो. असे डॉ. अतुल साठे यांनी सांगितले. अखंड रुग्ण सेवा करणारे मोहन , पॅरालिसिस पेशंट कडून व्यायाम करुन घेत. असे बरेच पेशंट त्यांनी बरे केले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी आहे. त्यांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेचा हा अंक प्रकाशक, संपादक प्रा. दिलीप फडके यांनी मीरा एंटरप्राईजेस्, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक–२ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळेकॉलनी, नाशिक – ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**फोन – चित्तपावन : २५०११०७,गद्रे मंगल कार्यालय : २५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :–**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http:\\twitter.com\nasikchitpavan
- http:\\facebook.com\nasikchitpavan
- http:\\youtube.com\user\nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.